मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# अखेर अनधिकृत बांधकामांवर बुलडोझर

## निळ्या पूररेषेतील 18 हजार चौरस फूट बांधकामे निष्कासन : 13 रो हाऊस आणि 3 पत्राशेडवर केली कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका हद्दीतील बोऱ्हाडे वाडी (मोशी) येथील इंद्रायणी नदी पात्रालगत पुररेषेत विना परवाना रो हाऊस बंगलो बांधण्यात आले होते. पुररेषेत बांधलेल्या घरांबाबत हरित लवादाकडे तक्रार करण्यात आल्या होत्या. महापालिकेने मंगळवारी (२१) १३ रो हाऊस बंगलो, ४ पत्राशेडवर आणि एका तीन मजली बंगल्यावर बुलडोझर फिरवत अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त केली आहेत. महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दखल घेऊन ही कारवाई केली आहे.



मोशीतील बोऱ्हाडे वाडी येथील स्वदेशा सोसायटीच्या पाठीमागील बाजूला इंद्रायणी नदी पात्रालगत बेकायदेशीर प्लॉटींग करण्यात आले होते. सर्वसामान्य नागरिकांना २० ते २५ लाख रुपये गुंठ्याने जागा खरेदी करत त्या जागेवर १३ रो हाऊस बंगलो उभारण्यात आले होते. इंद्रायणी नदी पात्राच्या ब्लू लाईनमध्ये हे सर्व बंगले येत होते. पुररेषेत विना परवानगी सर्व बांधकामे होत असताना महापालिकेच्या अधिकारी डोळ्यावर पट्टी बांधून झोपेचे सोंग घेतले होते. नागरिकांना सदरचा प्लॉट हा ग्रीन झोनमधून आर झोन झाला असून रेसीडेन्सील असल्याची जाहिरात करुन फसवणूक केली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील कामगार, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिकांनी ही घरे बांधली होती. आर झोन असल्याचे भासवून इंद्रायणी नदी पात्रात तसेच पुररेषेतच अर्धा, एक, दोन गुंठ्यांचे छोटे भुखंड तयार केले. ते भूखंड सर्वसामान्य नागरिकांनी विकत घेत त्या जागेवर घरे बांधली होती. पुररेषेत सर्व बेकायदेशीर प्लॉटींगची विक्री झालेल्या जागेवर विनापरवानगी घरे बांधली. आतापर्यंत १३ रो हाऊस तयार झाले होते. मात्र, काही जागा मालकांनी जागा घेऊन ठेवले होते. पण, त्या जागेवर बांधकामे केली नव्हती. त्या सर्व १३ रो हाऊस बंगलो, ३ पत्राशेड, एका तीन मजली इमारतीच्या सर्व आरसीसी बांधकामे बुलडोझर फिरवत जमीनदोस्त करण्यात आली आहेत.

### निळ्या पूररेषेतील १८ हजार चौरस फूट बांधकामे निष्कासन

महापालिकेच्या 'क' क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र.२ बोऱ्हाडेवाडी येथील गट क्र.२३३ व २३४ इंद्रायणी नदीपात्रातील निळ्या पूररेषेतील सुमारे १८ हजार चौरस फूटाची अनधिकृत बांधकामे निष्कासन करण्यात आली. या कारवाईसाठी महापालिकेने दोन पोकलेन, तीन जेसीबी यांच्या सहाय्याने केलेल्या कारवाईत नऊ दोन मजली बांधकाम, दोन तळमजल्यापर्यतची बांधकाम, दोन जोत्यापर्यंत बांधकामे अशी एकुण १२ हजार चौरस फुटांची आर.सी.सी. बांधकामे आणि चार पत्राशेडची एकूण ६ हजार चौरस फुट अशा १८ हजार चौरस फूटांचे विनापरवानगी बांधकाम पाडण्यात आली. आयुक्त शेखर सिंह यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली. यावेळी अतिक्रमण उप आयुक्त मनोज लोणकर, आण्णा बोदडे, उप अभियंता सूर्यकांत मोहिते,कनिष्ठ अभियंता संदीप वैद्य,किरण सगर, बीट निरीक्षक श्रीकांत फाळके त्याचप्रमाणे भोसरी एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनचे गणेश जामदार, किरण पठारे, ३० पोलीस कर्मचारी, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे २२ सुरक्षा रक्षक,अतिक्रमण आणि अग्निशामक पथकाचे जवान, वैद्यकीय विभागातील रूग्णवाहिकेचा समावेश होता.

### हरित लवादाकडे होती तक्रार

इंद्रायणी नदी पात्राच्या ब्लू लाईन, रेड लाईनमध्ये बेकायदेशीर प्लॉटींग करुन जागेची विक्री करण्यात आली. त्या जागेवर आता १० ते १३ रो हाऊस बांधण्यात आली. काही ठिकाणी पत्राशेड करण्यात आला. आणखी काही जागेवर घरे बांधण्यासाठी जागा विकत घेतलेले लोक वेट अ‍ॅन्ड वॉच च्या भूमिकेत आहेत.

### नागरिकांचे लाखो रुपयाचे नुकसान

» इंद्रायणी नदी पात्रात आणि पुररेषेतील प्लॉट विकत घेणाऱ्या नागरिकांची फसवणूक झाली आहे. स्थानिकांनी पूररेषेत माती, मुरुमाचे भराव टाकत बेकायदेशीर प्लॉटिंग केले होते. त्या प्लॉटींग जाहिरात करत रेसिडेन्सल असल्याचे भासवून नागरिकांना २० ते २५ लाख रुपये गुंठ्याने जागा विकल्या होत्या. त्यानंतर त्या जागेवर नागरिकांनी १३ रो हाऊसची बांधकामे केली होती. काहीचे प्लॉट रिकामे ठेवले होते. महापालिकेने पुररेषेत येणारी सर्व अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त केल्याने नागरिकांचे लाखो रुपयाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे 'तुपही गेले आणि तेलही गेले, हाती धुपाटने आले' अशी गत जागा विकत घेवून अनधिकृत बांधकामे करणाऱ्या नागरिकांची झाली आहे.

# तंबाखू न दिल्याने तरुणावर कोयत्याने वार

## शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी व दगडाने मारहाण : पिंपळे निलख येथील घटना

**पिंपरी | प्रतिनिधी**

तंबाखू मागितली असता, न दिल्याच्या रागातून तिघांनी तरुणावर कोयत्याने वार केले आहेत. ही घटना पिंपळे निलख येथे बुधवारी (दि.२२) घडली आहे. याप्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात कृष्णाकुमार उपेंद्र पासवान (वय २१ रा. पिंपळे निळख) फिर्याद दिली आहे. यावरून शुभम मानमोडे (रा.पिंपळे निलख), संकेत थोरात (रा.वाकड) व त्याचा साथीदार यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीड महिन्यापूर्वी तंबाखू दिली नाही याचा राग मनात धरून आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी व दगडाने मारहाण केली. यावेळी संकेत याने कोयत्याने फिर्यादीच्या हातावर डोक्यावर वार केले. तसेच फिर्यादीनुसार दुचाकीचे नुकसान केले. यावरून सांगवी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

# खडकवासला धरणांतील पाणी तळाला

## खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातील चार धरणांत सध्या 6.14 टीएमसी म्हणजे 21.06 टक्के पाणीसाठा शिल्लक

**पुणे | प्रतिनिधी**

खडकवासला धरणातून नवीन मुठा उजवा कालव्याद्वारे ग्रामीण भागासाठी बुधवारपासून (२२ मे) पाणी सोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे. सुमारे एक अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी दौंडला पिण्यासाठी सोडण्यात येणार आहे. हे पाणी दुसऱ्या उन्हाळी आवर्तनासाठी सोडण्यात येणाऱ्या अडीच टीमएसी पाण्यापैकी आहे का, याबाबत मात्र अद्याप स्पष्टता नाही.



खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातील चार धरणांत सध्या ६.१४ टीएमसी म्हणजे २१.०६ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. पाणी कमी झाल्याने पुणेकरांवर कपातीची टांगती तलवार आहे. अशा वेळी दुसऱ्या उन्हाळी आवर्तनासाठी सोडण्यात येणाऱ्या पाण्यानुसार कपातीचे नियोजन होण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागाला दिलेले पहिले उन्हाळी आवर्तन नुकतेच पूर्ण झाले. दुसरे आवर्तन अद्याप सुरू झालेले नाही, पण दौंड शहराला पिण्यासाठी पाणी सोडण्याची मागणी झाल्यामुळे सध्या एक टीमएसी पाणी सोडण्यास सुरुवात करण्यात आल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

शहराला टेमघर, वरसगाव, पानशेत आणि खडकवासला या चार धरणांमधून प्रामुख्याने पाणीपुरवठा केला जातो. याबरोबरच दौंड, इंदापूरसह पुरंदर आणि बारामतीच्या काही भागांनादेखील पाणी दिले जाते. कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे ४ मार्चपासून पहिल्या आवर्तनासाठी पाणी सोडण्यास सुरुवात करण्यात आली. हे पाणी ९ मेपर्यंत सोडण्यात आले. या कालावधीत ५.९ टीएमसी पाणी सोडण्यात आले होते. आता पुन्हा २२ मेपासून पाणी सोडण्यास सुरुवात झाली आहे. २२ मे रोजी ५०० क्युसेक, तर २३ मे रोजी ७०३ क्युसेकने पाणी नवीन मुठा उजवा कालव्यात सोडण्यात आले. दौंड शहराला पिण्यासाठी हे पाणी सोडण्यात येत असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

दरम्यान, खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातील चारही धरणांत ६.१४ टीएमसी (२१.०६ टक्के) पाणीसाठा शिल्लक आहे. त्यांपैकी टेमघर धरणात ०.१६ टीएमसी (४.४५ टक्के), वरसगाव ३.१६ टीएमसी (२४.६४ टक्के), पानशेत १.९१ टीएमसी (१७.९७ टक्के) आणि खडकवासला ०.९० टीएमसी (४५.७२ टक्के) इतका पाणीसाठा शिल्लक आहे.

### धरणांतील पाणीसाठा

टेमघर : ०.१६ टीएमसी (४.४५ टक्के)
वरसगाव : ३.१६ टीएमसी (२४.६४ टक्के)
पानशेत : १.९१ टीएमसी (१७.९७ टक्के)
खडकवासला : ०.९० टीएमसी (४५.७२ टक्के)
एकूण : ६.१४ टीएमसी (२१.०६ टक्के)

> दौंड शहराला पिण्यासाठी पाणी सोडण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार नवीन मुठा उजवा कालव्यातून बुधवारपासून पाणी सोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे. एक टीएमसी पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे.
>
> **- श्वेता कुऱ्हाडे, कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग.**

# अपघात प्रकरणातील गाडीचा ड्रायव्हर बदलण्याचा प्रयत्न

## आरोपीला पिझ्झा दिला का? : पोर्श कार अपघात प्रकरणात पोलीस आयुक्तांची मोठी माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यामध्ये शनिवारी रात्री आलिशान पोर्श कार बेदरकारपणे चालवून अल्पवयीन चालकाने एका दुचाकीला धडक दिल्याची घटना घडली होती. या अपघातात दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या अनिश अवधिया आणि अश्विनी कोस्टा या दोघांचा मृत्यू झाला. या घटनेचे पुण्यासह संपूर्ण देशभरात तीव्र पडसाद उमटले आहेत. याप्रकरणी अपल्वयीन आरोपीच्या वडिलांनाही अटक करण्यात आलेली आहे. तसेच अल्पवयीन मुलाची बालसुधारगृहात रवानगी करण्यात आलेली आहे. दरम्यान आता या प्रकरणात पुणे पोलीस आयुक्तांनी पत्रकार परिषद घेत घटनेसंदर्भात सविस्तर माहिती दिली आहे.



अमितेश कुमार म्हणाले, ही घटना घडल्यानंतर पोलीस ठाण्यात ३०४ अ गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, या घटनेचे गांभीर्य पाहाता त्यानंतर ३०४ हे कलम वाढवण्यात आलं. त्याच दिवशी आम्ही बाल न्याय मंडळाकडे त्या आरोपीला सज्ञान म्हणून ट्रिट करण्यात यावं, अशी मागणी केली होती. मात्र, तेव्हा आमची मागणी मान्य झाली नाही. त्यानंतर पुढच्या न्यायालयात जाण्याचा निर्णय आम्ही घेतला. तसेच आरोपी मुलाच्या वडीलांवर आणि पब मालकांवरही गुन्हा दाखल करण्यात आलेला असून त्यांना अटक करण्यात आलेली आहे. आरोपी मुलाची बालसुधारगृहात रवानगी करण्यासाठी आम्ही बाल न्याय मंडळाकडे मागणी केली होती, त्यानंतर आमची मागणी मान्य झाली आणि आरोपीची १४ दिवसांसाठी बालसुधारगृहात रवानगी करण्यात आली, असं पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितलं.

आरोपीला सज्ञान म्हणून ग्राह्य धरण्यासाठी बाल न्याय मंडळाकडे प्रोसेजर सुरू आहे. आरोपीच्या वडीलांची पोलीस कोठडी आज संपत असल्यामुळे आम्ही त्यांना पुन्हा न्यायालयात दाखल करणार आहोत. या सर्व प्रकरणाचा तपास संवेदनशीलपणे सुरु आहे. या प्रकरणात पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाला का? याचा तपास सुरु आहे. अशा प्रकारे तापस करून आम्ही लवकरात लवकर न्याय देण्याचा आणि आरोपींना शिक्षा मिळेल यासाठी प्रयत्न करत आहोत. या प्रकरणात न्यायालयात योग्य ती बाजू मांडण्यासाठी आम्ही उपाययोजना करत आहोत, असंही पोलीस आयुक्त म्हणाले.

आरोपीच्या पालकाने अल्पवयीन मुलाला गाडी चालवण्यास दिली, याचाही तपास सुरू असून या प्रकरणात कारवाई करण्यास दिरंगाई झाली किंवा कोणी मॅनेज झाले असा काही आरोप होत आहे. मात्र, आम्ही यावर सांगतो की, अशा प्रकारच्या घटनांमध्ये कायद्याच्या मार्गावर पोलीस चालत आहेत. यामध्ये दिरंगाई झाली किंवा कोणी मॅनेज झालं असं म्हणणं योग्य नाही. आता सुरुवातीला ३०४ कलम का लावण्यात आलं नाही, तसेच आरोपीला पिझ्झा खाण्यासाठी दिला का? याबाबत चौकशी सुरू आहे, असंही पोलीस आयुक्तांनी सांगितलं.

या घटनेतील आरोपीचे ब्लड रिपोर्ट आले नाहीत. सुरुवातीला ब्लड सॅंपल घेण्यात आले होते. त्यानंतर दुसऱ्यांदाही ब्लड सॅंपल घेण्यात आले होते. त्यामध्ये आमचे फॉरेन्सिक लॅबला आवाहन आहे की, दोन्ही ब्लड सॅंपल आरोपीचे आहेत की नाही, याची खात्री करावी. आरोपी मद्य पित असतानाचे सीसीटीव्ही आमच्याकडे आहेत. त्या सीसीटीव्ही फुटेजद्वारे तपास सुरु आहेत. या घटनेत गाडीचा ड्रायव्हर बदलण्याचा प्रयत्न झाला ही बाब आमच्या चौकशीत समोर आली आहे, असंही पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितलं.

### गाडीत किती लोक होते?

“पोर्श या गाडीतमध्ये अपघात घडला तेव्हा एकूण चार लोक होते. त्यातील एकजण गाडी चालवत होता. अजून दोन मुले होते आणि एक ड्रायव्हर होता. तसेच ज्या पबमध्ये पार्टी झाली, त्यावेळी आणखी सात ते आठ लोक त्या ठिकाणी होते. यातील ड्रायव्हरचं विधान महत्वाचं असून ते ग्राह्य धरण्यात येईल”, असं पुणे पोलीस आयुक्तांनी सांगितलं.

# अपयशाचे खापर राष्ट्रवादीवर फोडू नका

## खासदार श्रीरंग बारणेंच्या आरोपा नंतर आमदार सुनील शेळके यांचा पलटवार

**पिंपरी | प्रतिनिधी**

जर मावळ विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे महायुतीचा धर्म पाळला असता तर समोरच्या उमेदवाराची अनामत रक्कम जप्त झाली असती, असे विधान महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी केले. याला प्रत्युत्तर देताना आमदार शेळके यांनी आपल्या अपयशाचे खापर राष्ट्रवादीवर फोडू नका असा टोला लगावला.

याबाबत बोलताना आमदार शेळके म्हणाले की, आप्पा बारणे हे नक्कीच विजयी होणार आहेत. मात्र आपले मताधिक्य कमी होणार असल्याने त्याचे खापर त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या डोक्यावर फोडण्याचे काम बारणे यांनी करू नये.

त्यांच्या विजयासाठी स्वतः अजित पवार यांनी मावळ तालुक्यात सभा घेतली. जिथे जिथे अडचणी वाटतील तिथे त्या सोडण्याचे काम अजितदादांनी केले आहे. त्यामुळे जाणीवपूर्व कोणत्या बातम्या किंवा अफवा पसरविण्याचे काम बारणे यांनी करू नये.प्रसारमाध्यमांशी बोलताना बारणे म्हणाले होते की आमदार आणि पदाधिकाऱ्यांनी काम केले. मात्र काही ठिकाणी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी महायुतीचे काम केले नाही. ही जर माहिती बारणे यांच्याकडे होती तर ती मतदानापूर्वी आम्हाला द्यायला पाहिजे होती. आता निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली.

पुढे मताधिक्य कमी होईल. हे मताधिक्य कमी होताना इतर पक्षांच्या कार्यकर्त्यांवर आरोप करायचे. आपल अपयश लपविण्यासाठी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांवर खापर फोडू नये. बारणे यांच्याबाबत मतदारांमध्ये नाराजी होती हे त्यांना मान्य करावे लागेल. तरी देखील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी झोकून काम केले. आमच्या कार्यकर्त्यावर जर कोणी असे आरोप करीत असेल तर त्यांच्याशी न बोलणेच योग्य राहिल.

विजयाचे श्रेय स्वतःच्या कर्तुत्वामुळे अशा पद्धतीने स्वतःची टीमकी बारणे यांनी वाजविणे योग्य नाही. बारणे हे कार्यकर्त्यांच्या जोरावर निवडून येतील. त्यामुळे त्यांनी कोणत्याच पक्षाच्या कार्यकर्त्याला विसरू नये. बारणे यांना उमेदवारी मिळण्याअगोदर आमच्या पक्षाचा उमेदवारीसाठी आग्रह होता.

मात्र त्यांना उमेदवारी मिळाल्यानंतर आम्ही तन, मन आणि धनाने झटून काम केले. आपण आपली बाजू कमकुवत आहे, हे झाकण्याचे काम बारणे यांनी करू नये. प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम केले आहे, हे बारणे यांनी विसरू नये.



### खासदार बारणे यांनी व्यक्त केली होती खदखद

» अजित पवार आणि पार्थ पवार यांनी माझं काम केलं. तश्या सूचना त्यांनी खालच्या कार्यकर्त्यांना केल्या, पण त्यांनी माझं काम केलं नाही. त्यांच्यात नाराजी होती, ती शेवटपर्यंत राहिली. त्यांनी चुकीच्या पद्धतीने काम केल. अशी खदखद बारणे यांनी बोलून दाखवली आहे. बारणे हे पिंपरी- चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

### निकालानंतर पडसाद उमटणार?

» निवडणुकीच्या प्रचारात हातात हात घालून काम करणारे महायुतीचे नेते निवडणूक प्रक्रिया पार पडताच आत्तापासूनच एकमेकांवर आरोप करू लागले आहेत ४ जून रोजी लोकसभा निवडणुकीचा निकाल लागणार आहे. या निकालाचे पडसाद नक्कीच मावळ तालुक्यात उमटतील. याचा थेट परिणात आगामी विधानसभेच्या निवडणुकीवर होणार आहे. त्यामुळे आगामी काळात युती राहणार की नाही, याबाबतही कार्यकर्त्यांच्या मनात संभ्रम आहे. मात्र महायुतीतील या कलगीतुऱ्यामुळे मतदारांचे मात्र मनोरंजन होत आहे.

# महावितरणचा ग्राहकांना वाढीव वीज बिलाचा शॉक

## दरवाढ वाढलेले वीज वापर : सर्वसामान्यांच्या वीज बिलात तीन महिन्यात दुपटीने वाढ

**पिंपरी | प्रतिनिधी**

महावितरणच्या वाढलेल्या वीज बिलाचा फटका सर्वसामान्य ग्राहकांना बसत आहे. एप्रिल महिन्यापासून लागू झालेली दरवाढ आणि उन्हाळ्यामुळे वाढलेला वीज वापर या प्रमुख कारणांमुळे वीज बिलात मोठी वाढ झाली आहे. त्याचा परिणाम म्हणजे ग्राहकांच्या खिशाला आर्थिक झळ बसत आहे.

महावितरण वीज बिलात सरासरी ११ टक्क्यांपर्यंत दरवाढ सांगण्यात येत असली तरी इतर शुल्कांमध्ये केलेली वाढ आणि उन्हाळ्यामुळे वाढलेल्या वीज वापराने अनेक ग्राहकांना यंदा दुप्पट वीज बिल आहे. मागील महिन्याच्या दुप्पट वीजबिल आल्याने वीज ग्राहक त्रस्त झालेले आहेत. त्यात सतत खंडित होणारा वीजपुरवठा आणि बिल मात्र दुप्पट अशी ग्राहकांची स्थिती झाली आहे.

घरगुती आणि औद्योगिक वीजग्राहकांची विजेची मागणी वाढली आहे. महावितरणकडून एप्रिल महिन्यापासून वीज दरवाढ लागू झाली आहे. युनिटनुसार दरामध्ये मोठी वाढ झाली आहे. १०० युनिटपर्यंत वीज वापर असलेल्या वीजग्राहकांना त्याचा कमी फटका बसत असला तरी १०० युनिटपेक्षा जादा वीज वापर असणाऱ्यांना वाढीव वीज दरवाढीचा चांगलाच फटका बसत आहे.



### वीज बिलात झाली भरसाठ वाढ

» फेब्रुवारी महिन्यात ज्या घरगुती वीज ग्राहकांना ८०० रुपयांपर्यंत वीज बिल येत होते. त्यांना एप्रिल महिन्यात तब्बल १ हजार ६०० रुपयांपर्यंत वीज बिल आले आहे. तर, मे महिन्यात तर वीज बिलाचा हा आकडा दोन हजार रुपयांपुढे जाऊन पोहचला आहे. त्यामुळे ग्राहकांच्या खिशाला चांगलाच आर्थिक शॉक लागलेला आहे.

### वीज वापराच्या टप्प्यांचा खेळ

» महावितरणने वीज वापराचे टप्पे तयार केले असून ० ते १०० पर्यंत प्रति युनिट दर ५.८८ प्रति युनिट आहेत. परंतु सोबतच इंधन अधिभार, मागणी अधिभार, स्थिर आकार, वहन आकार असे अनेक आकार जोडत वीज बिल वाढविले जाते. आज प्रत्येक घरात फ्रीज, फॅन असतात यामुळे शंभर युनिटच्या आत वापर होणे जवळपास अशक्य आहे. विशेषत: उन्हाळ्यात २४ तास फॅन चालू राहत असल्याने वापर वाढतो. शंभर युनिटच्या पुढे जाताच दर दुप्पट होऊन ११ रुपये ४६ पैसे प्रति युनिट होतो. तीनशे युनिटच्या पुढे हा दर १४ रुपये ७२ पैसे प्रति युनिट होतो. तर पाचशे युनिटच्या पुढे हा दर १८ रुपयांच्या पुढे जातो.

# उजनीतील घटनांमध्ये 38 जणांना जलसमाधी

## 16 ठिकाणी बेकायदेशीर प्रवासी वाहतूक : बोटीचालकांवरती कारवाई होणार का?

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे, सोलापूर,अहमदनगर जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्राला वरदायिनी ठरलेल्या उजनी जलाशयातील प्रवासी वाहतूक वेळोवेळी जीवघेणी ठरत आहे. या बेकायदेशीर प्रवासी वाहतूकीला कोणाचा वरदहस्त आहे? कारवाई का होत नाही? याबाबत आता पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे. कारण उजनी जलाशयात 16पेक्षा जास्त ठिकाणी बेकायदेशीर प्रवासी वाहतूक होत आहे. याच बेकायदेशीर प्रवासी वाहतूक करणाऱ्या बोटीचालकांवरती कारवाई होणार का असा प्रश्न निर्माण झाला आहे.

उजनी जलाशयात दोन दिवसांपूर्वी प्रवासी वाहतूक करणारी बोट उलटून सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. जलाशयात प्रवासी वाहतूक करण्यासाठी विविध परवान्यांची आवश्यकता नाही. जलप्रवास करताना कोणतीही सुरक्षित साधनांचा वापर केला जात नाही. जलवाहतूक करणाऱ्या बोटींना कोणतेही नियम व अटी नाहीत.



### या ठिकाणी बेकायदेशीर जलवाहतूक

» 1) वाशिंबे ते गंगावळण 2) चिकलठाण ते पडस्थळ 3)कुगाव ते शिरसोडी 4)कुगाव ते कळाशी 5)कुगाव ते कालठण 6)ढोकरी ते शहा 7)केतुर ते चांडगाव 8)शिरसोडी ते चिकलठाण अशा बेकायदेशीर जलवाहतुक करणाऱ्या बोटींची संख्या अधिक झाली असून हा प्रकार फोफावला असल्याने अनेक निरापराध लोकांचा जीव गेला आहे.

त्यामुळे राजकीय वरदहस्त असला म्हणजे सगळं काही चालतंय, अशी परिस्थिती अनेक वर्षांपासून निर्माण झाली आहे. उजनी जलाशयाचे पुणे आणि सोलापूर हद्दीतील पाणलोट क्षेत्रात 16 पेक्षा जास्त ठिकाणी जीवघेणी बेकायदेशीर जलवाहतूक होते. या जलवाहतुकीकडे जलसंपदा व महसूल विभागातील कोणाचेही लक्ष नाही अथवा अंकुश नाही. त्यामुळे दोन दिवसांपूर्वी कळाशी- कुगाव दरम्यानच्या दुर्दैवी अपघाताला जलसंपदा विभाग व महसूल विभाग जबाबदार असल्याचे बोलले जात असून तसा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

कळाशी-कुगाव प्रवासी वाहतूक करणाऱ्या बोटींवर सुरक्षा साहित्य जॅकेट ठेवले जात नसल्याने जलप्रवास करणाऱ्या प्रवाशांची सुरक्षितता रामभरोसे होती. या प्रवास वाहतूक करणाऱ्या बोटींना जलसंपदा विभागाने रजिस्टर अथवा परवाना दिलेला नंबर आहेत का. या बोटीची नोंद कुठे केली आहे? किंवा या बोटीचा विमा उतरवलेला आहे का? याबाबत कोणीही चौकशी करत नाही किंवा करायला जातही नाही.

### धक्कादायक पाच घटना

» करमाळा तालुक्यातील टाकळी येथे उजनी जलाशयात 1993 मध्ये टाकळी ते पळसदेव प्रवासी वाहतूक करणाऱ्या होडीचा अपघात होऊन सुमारे 26 जणांना दुर्दैवी जलसमाधी मिळाली होती. त्या घटनेत निरापराध 26 लोकांचा अंत झाला होता. या घटनेचे तीव्र प्रसाद त्यावेळेस ही उमटले होते. 2017 मध्ये माळशिरस तालुक्यातील अकलूज, नातेपुते या भागातील उजनीच्या जलाशयावरती सहलीसाठी आलेल्या डॉक्टरांचा इंदापूर तालुक्यातील आजोती येथे होडी उलटून चार डॉक्टरांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. करमाळा तालुक्यातील केम येथे लग्नकार्याला आलेल्या अकलूज येथील बापलेकाचा होडी उलटून मृत्यू झाला होता, ही घटना मार्च 2021 मध्ये घडली होती. 2022 च्या जानेवारीमध्ये चिकलठाण येथे मुंबईहून साखरपुड्यासाठी आलेले मच्छीमारांचे दोन नातेवाईक होडीतून फेरफटका मारताना त्यातील एकाने पोहण्यासाठी उडी मारली त्याला वाचवण्यासाठी एकाने दुसऱ्याने उडी मारली आणि बुडणाऱ्याने गळाला मिठी मारल्याने दोघेही बुडाले. त्या घटनेच्या दोघांचाही मृत्यू झाला. दोन दिवसांपूर्वी उजनी जलाशयात बोट पलटी होऊन सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. जो पर्यंत काटेकोरपणे या घडलेल्या घटनांकडे प्रशासन पाहत नाही व पाण्यातील प्रवासी नियमांचं पालन होत नाहीत तोपर्यंत अशा घटना व अपघात घडतच राहणार आहेत.

# पुणे पोलिसांनी साधा संपर्कही साधला नाही

## कल्याणीनगर दुर्घटनेतील मृत अनिश, अश्विनीच्या कुटुंबीयांनी व्यक्त केली खंत

**पुणे | प्रतिनिधी**

संपूर्ण देशात खळबळ उडविणाऱ्या पुण्यातील पोर्शे कार अपघातात मध्य प्रदेशातील जबलपूर येथील दोन आयटी इंजिनिअरचा मृत्यू झाला. पुण्यातीलच नव्हे तर देशातील नागरिक या घटनेच्या निषेधार्थ पुढे आले आहेत. बेभान कार चालविणाऱ्या बिल्डरपुत्रावर नागरिकांच्या दबावामुळे कारवाईही झाली. मात्र, पुणे पोलिसांनी अद्यापर्यंत या दोन्ही आयटी इंजिनिअरच्या कुटुंबाशी संपर्कही साधला नसल्याची खंत कुटुंबीयांनी व्यक्त केली.

मृत अनिश अवधियाचे मामा ज्ञानेंद्र सोनी म्हणाले की, आमच्याशी पुणे पोलिसांनी संपर्क तर केला नाहीच. पण मध्य प्रदेश सरकारचाही कोणी प्रतिनिधी आमच्या भेटीस आला नाही.





रविवारी पहाटे १७ वर्षांचा मुलगा आपल्या तीन मित्रांसह दोन पबमध्ये वेळ घालवून घरी परतत असताना त्याने कल्याणीनगर रस्त्यावर भरधाव पोर्शे कार चालवली होती. यामध्ये मोटारसायकलवरून जाणारा अनिश अवधिया आणि अश्विनी कोस्टा यांचा जागीच मृत्यू झाला होता. अनिशने डीवाय पाटील कॉलेजमधून पदवी पूर्ण केली होती. अश्विनीने वाडिया कॉलेजमधून अभियांत्रिकीची पदवी पूर्ण केली होती. दोघे एका आयटी कंपनीत काम करत होते.

अनिशची आई सविता म्हणाली, "आताच कोठे आमचे चांगले दिवस सुरू झाले होते. अनिशचे नाव लकी होते. कारण, तो आम्हा सर्वांसाठी लकी चार्म होता. आमची पिढी व्यवसायात असली तरी तो आमच्या कुटुंबातील पहिला अभियंता होता. माझे पती ओमप्रकाश प्रींटिंग प्रेसचा व्यवसाय चालवतात. त्यासाठी आम्ही आमचे दागिने विकले होते. अनिशमुळे आम्ही खूप स्वप्ने पाहिली होती. अनिशला अभियांत्रिकीमध्ये पदव्युत्तर शिक्षण घ्यायचे होते. धाकट्या भावाला अभियांत्रिकी शिक्षणासाठी मदत व्हावी म्हणून त्याने त्याग केला आणि नोकरी सुरू केली होती.

अनिशचे वडील ओमप्रकाश म्हणाले, "मुलापेक्षाही तो माझा चांगला मित्र होता. आम्ही त्याला लकी म्हणायचो. त्याचे परदेशात जाण्याचे स्वप्न होते.

अश्विनीचा मोठा भाऊ संप्रित म्हणाला, "आमच्या दु:खावर कोणताही उपाय होऊ शकत नाही. आमच्या आणि अवधिया कुटुंबीयांच्या वेदना कोणाला समजणार नाहीत. एका सेकंदात आमचे स गळे आयुष्यच बदलून गेले आहे.